# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे

Pune Metropolitan Region Development Authority, Pune

३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पिंपरी-चिंचवड, पुणे 411044

3rd floor, New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune – 411044

Phone no. 020-259 33 333 / 44 / 56 Email: comm.@pmrda.gov.in


## सुधारित तात्पुरते रेखांकन परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

(मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.६.१ नुसार)

जा.क्र. : DP/बीएमए/मौ.जांभुळ/ग. नं. २०२,२०३ व इतर/प्र.क्र.PMRDA-२५-६१६२० दि.१२/०८/२०२५

PMRDA/TR/2025/APL/0002

प्रति,

मे. प्रिस्टीन मॉन्टवर्ट असोसिएटस तर्फे अधिकृत भागीदार
श्री. प्रितम ईश्वरचंद गोयल तर्फे, क्रिसाला बिल्ड स्केप एलएलपी
तर्फे भागीदार श्री. सागर अगरवाल
रा. ऑफिस नं. ४१० ते ४१२ सिटी एव्हेन्यु मुंबई बँगलोर हायवे शेजारी जॅग्वार
शोरुम शेजारी वाकड पुणे -५७,

मौजे-जांभुळ, तालुका-मावळ,जिल्हा- पुणे, येथील ग. नं.२०२, २०३, २०४, २०५, २०८, २१२पै, २१३, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२६, २२७, २२८, २२९, २३२, २३३, २३५पै, २३७पै, क्षेत्र-२५४७२०.००चौ.मी. क्षेत्रावरील "तात्पुरते रहिवास रेखांकन" प्रकल्पामधील सुधारित रेखांकन प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे.

आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून उक्त प्रस्तावास मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र. ६.६.१ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये सुधारित तात्पुरते रेखांकन परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने)

सह महानगर नियोजनकार
(विकास परवानगी विभाग)
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे

**प्रत** :- उपअधिक्षक, भुमि अभिलेख, मावळ यांना परिशिष्ट 'अ' अट क्र. २ मध्ये नमुद प्रमाणे मोजणी करणेकामी अग्रेशित.

---

मौजे-जांभुळ, तालुका-मावळ,जिल्हा- पुणे, येथील ग. नं.२०२, २०३, २०४, २०५, २०८, २१२पै, २१३, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२६, २२७, २२८, २२९, २३२, २३३, २३५पै, २३७पै, क्षेत्र-२५४७२०.००चौ.मी. क्षेत्रावरील **"सुधारित तात्पुरते रहिवास रेखांकन"** प्रस्ताव.

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि. / /२०२५ रोजीचे पत्र क्र. /२४-२५**

**सोबतचे**

**परिशिष्ट 'अ'**

१) मंजूर नकाशाप्रमाणेच जागेचा विकास व बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२) मंजूर रेखांकन नकाशाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर सिमांकन आखणी करुन जागेची मोजणी भुमि अभिलेख विभाग यांचेकडून करुन घेणे अर्जदारवर बंधकनकारक राहील. या मुळे मोजणी नकाशामध्ये (Demarcated Plan) रेखांकनातील भुखंडाचे क्षेत्र, अंतर्गत रस्त्याखालील क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे. अशा प्रमाणीत रेखांकनाची प्रत या कार्यालयाकडे सादर करुन त्यास (Final Layout Approval) अंतीम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करणेत येऊ नये.

३) मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील आदेश क्र. MAVAL/NA/SR/८०/२०१८, दि.०१/०३/२०२१ व जा.क्र. Maval/NA/SR/२६/२०२५, पुणे दि. ०८/०८/२०२५ या पत्रातील जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्रा मधील अटीं व शर्ती अर्जदार/ विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

४) प्रस्तावासोबत मोजणी मो.र.नं.२६७३/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं.२६७७/२०२३, दि.२६/१२/२०२३,मो.र.नं.२६८१/२०२३,दि.२६/१२/२०२३,मो.र.नं२६६२/२०२३,दि.२६/१२/२०२३, मो.र.नं. २६७८/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं. २६६४/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं २६७४,२६७५/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं. २६८२/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं. २६७१/२०२३,दि.२६/१२/२०२३,मो.र.नं.२६७०/२०२३,दि.२६/१२/२०२३,मो.र.नं.२६६६/२०२३, दि.२६/१२/२०२३,मो.र.नं.२६६७/२०२३,दि.२६/१२/२०२३,मो.र.नं.२६६३/२०२३,दि.२६/१२/२०२३ मो.र.नं. २६६५/२०२३,दि.२६/१२/२०२३, मो.र.नं. २६८०/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं. २६७२/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं. २६७६/२०२३, दि.२६/१२/२०२३, मो.र.नं २६७९/२०२३, दि.२६/१२/२०२३,मो.र.नं.२६६९/२०२३,दि.२६/१२/२०२३,मो.र.नं.२६६८/२०२३,दि.२६/१२/२०२३ ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे तसेच जागेच्या मालकी / वहिवाटीबाबत अर्जदाराने /विकासकाने/ जमीनमालकाने याबाबत सादर केलेल्या /प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे. सदर जमिनीचे वहीवाटीचे/ हद्दीचे अनुषंगाने अथवा इमारतीबाबत कोणतेही व्यक्तिगत वाद/ न्यायालयीन वाद उद्‌भवलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / विकासक / जमिनमालक यांची राहील. ज्या जागेची मालकी / वहिवाट, अर्जदार /विकासक / जमिनमालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीव्दारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

५) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार / जमीनमालक /विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

६) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम,१९७६ हा निरसित झाला असल्याने या अधिनियमांतर्गत बाबींकरिता प्रस्तावासोबत आपण रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील दिनांक-

मौजे-जांभुळ, तालुका-मावळ,जिल्हा- पुणे, येथील ग. नं.२०२, २०३, २०४, २०५, २०८, २१२पै, २१३, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२६, २२७, २२८, २२९, २३२, २३३, २३५पै, २३७पै, क्षेत्र-२५४७२०.००चौ.मी. क्षेत्रावरील **"सुधारित तात्पुरते रहिवास रेखांकन"** प्रस्ताव.

---

०२/०५/२०२५ रोजी नोटरी श्रीमती. सविता प्रदिपकुमार रोकडे यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र क्र.५८/२०२५ सादर केले आहे. सदर शपथपत्र व बंधपत्रास अधिन राहून सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार /जमीनमालक /विकासक यांची राहील सदर शपथपत्र व बंधपत्रातील माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास झालेले बांधकाम अनधिकृत समजून कारवाईस पात्र राहील.

७) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी रेखांकन जागेवर सिमांकित करुन भूमि अभिलेख खात्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मंजूर रेखांकनानुसार जागेवरील सिमांकन झाल्यानंतर, भूखंडाचे क्षेत्रफळ, रसत्यांची रुंदी, १५% सुविधा भुखंड व १०% खुल्या जागेचे क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करता येणार नाही. तसेच मंजूर रेखांकनानुसार अंतर्गत रस्ते, सुविधा भूखंडातील क्षेत्र त्याचप्रमाणे मंजूर प्रादेशिक योजनेचे रस्ते / रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र जागा मालकास/ विकासकास वाढीव चटईक्षेत्राच्या बदलात संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचे झाल्यास अशा अनुषंगिक क्षेत्राची मोजणी जागा मालकाने /विकसकाने संबंधित भूमी अभिलेख विभागाकडे रितसर अर्ज करुन घेणे बंधनकारक राहील. तदनंतर अशा क्षेत्राखालील जमिनीचे खरेदीखत संबंधित नियोजन प्राधिकरणाचे नावाने जागा मालकाने /विकसकाने स्वखर्चाने करुन देऊन तसा ७/१२ उतारा व त्याप्रमाणे प्रत्येक्ष जागेचा ताबा दिल्यानंतरच अशा क्षेत्राचा वाढीव चटई क्षेत्र मिळणेबाबत आवश्यक त्या बांधकाम नकाशा व अनुषंगिक कागदपत्रासह अर्ज करण्यास अर्जदार पात्र राहतील.

८) अभिन्यासातील रस्ते, व खुली जागा यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले वर्गीकृत /प्रादेशिक योजना रस्ते/ रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीनमालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.

९) विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र. ६.८ नुसार रेखांकनातील सर्व मुलभूत सुविधा (रस्ते, गटारे, मलनिःस्सारण व्यवस्था, पाणी पुरवठा, लाईट, स्टॉम वॉटर इ.) उपलब्ध करुन देणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. तसेच सदर नियमातील तरतूदीनुसार खुली जागा विकसीत करण्यासह सर्व पायाभुत सुविधा दोन वर्षात विकसीत करण्याची जबाबदारी इत्यादी अर्जदार/ विकासक/ जमीनमालक यांची राहील. मुलभुत सुविधा ज्याप्रकारे पूर्ण होतील त्यानुसार बांधकाम करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

१०) जागेतील/ जागेलगतच्या नाल्याच्या/ नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील भूपृष्ठ रचनेमध्ये अनाधिकृत बदल करता येणार नाहीत. सदर अटीचा भंग करुन विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांची राहील.

पु.म.प्र.वि.प्रा.



Housiey.com

मौजे-जांभुळ, तालुका-मावळ,जिल्हा- पुणे, येथील ग. नं.२०२, २०३, २०४, २०५, २०८, २१२पै, २१३, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२६, २२७, २२८, २२९, २३२, २३३, २३५पै, २३७पै, क्षेत्र-२५४७२०.००चौ.मी. क्षेत्रावरील **“सुधारित तात्पुरते रहिवास रेखांकन”** प्रस्ताव.

---

११) विषयांकित रेखांकन नकाशाची छाननी प्रस्तावसोबत उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा. ७/१२ उतारे, कुलमुखत्यारपत्र, संमती पत्र, मोजणी नकाशा इ.) या कागदपत्रांच्या अधिकद्यततेबाबत व अद्ययावत नोंदीबाबत अर्जदार जबाबदार राहतील.

१२) विषयाकिंत जागेचे एकुण क्षेत्र विचारात घेऊन रेखांकन नकाशाची छाननी केलेली असून रेखांकनातील स्वतंत्र भुखंड मंजूरी खेरीज उक्त जागेची तुकडया तुकडयाने उपविभागणी करुन विक्री करता येणार नाही.

१३) प्रस्तावित जागेचे अथवा गट नंबर मधील उर्वरित जागेचे तुकडे पाडुन अथवा गुंठेवारी प्रमाणे अनाधिकृतरित्या भुखंड पाडता येणार नाही. अशा प्रकारे अनाधिकृतरित्या तुकडे पाडल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

१४) विषयांकित रेखांकन नकाशातील गणितीय चुका वा जागेवर बांधकाम नकाशावर नमूद केल्या व्यतिरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधित वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील. जागेतील/ जागेलगतच्या नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही व नाल्यास सुयोग्य मजबुतीकरण करणे आवश्यक राहील.

१५) पोहच रस्तारुंदीने बाधीत क्षेत्र रस्त्याचे सार्वजनिक वापरासाठी कायमस्वरुपी खुले ठेवणे आवश्यक राहील व समुचित प्राधिकरणाने ही जागा मागणी केल्यानंतर ती विनातक्रार प्राधिकरणाच्या ताब्यात देणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

१६) अर्जदार/विकासक/ जमिनमालक यांनी रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील **क्र.५६, दिनांक** - ०२/०४/२०२५ अन्वये दिलेल्या शपथपत्रास अधिन राहुन ही परवानगी देण्यात येते असुन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी सुधारित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.( नियम क्र. ७.१)

१७) विकास नियंत्रण नियमावली २०१८ मधील नियम क्र. १५.२.३३ नुसार मंजूर अंतिम रेखांकनातील अंतर्गत रस्त्याखालील क्षेत्र जागेवर मोजणी व विकसीत करुन १/- रुपये मोबदल्यात प्राधिकरणाच्या ताब्यात देणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

१८) सदर जमिनीचे क्षेत्रफळ ५०० चौ.मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक ८० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड याप्रमाणे वृक्ष लागवड करणे व त्याची जोपासणा करणे अर्जदार/ विकासक /जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

१९) महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम 2009 मधील अनुसूची १ कलम ७ (एच) मधील प्रमाणकानुसार वृक्षांची लागवड करतांना स्थानिक वृदु हवामान तसेच स्थानिक उपलब्ध वृक्षांच्या जाती विचारात घेऊन अनुरूप असलेल्या संवर्गातील वृक्षांची निवड करण्याची काळजी घ्यावी.

२०) मिळकतीवर स्थानिक जातीच्या वृक्षांची लागवड करणेसाठी ३ x ३ फूट आकाराची जागा प्रत्येक चार मीटर अंतरावर सोडणे आवश्यक आहे व तशी जागा नकाशावर दाखवणे आवश्यक आहे.

पु.म.प्र.वि.प्रा.

---

२१) बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर काम चालू करण्याआधी वृक्ष पूर्ण काढणे/पुनर्रोपण करणेसाठी मा. वृक्ष प्राधिकरण समितीची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

२२) भाग/अंतिम भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करते वेळी वृक्ष प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. भाग भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास एकूण मंजूर बांधकाम क्षेत्रापैकी भाग भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या क्षेत्राच्या प्रमाणात मानांकानुसार वृक्षांची लागवड करणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तावित एकच इमारत असल्यास ना-हरकत दाखला घेणे पूर्वी मानांकानुसार संपूर्ण वृक्षांची लागवड करण्यात यावी. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील वृक्ष लागवडीबाबतच्या अटी व शर्तीचे पालन न झाल्यास वृक्ष संवर्धनाच्या अनुषंगाने प्रती झाड र. रु. २०००/- या प्रमाणे अनामत रक्कम भरणे तसेच निकषानुसार झाडे लावल्यानंतर वृक्षांसंबंधीत भाग/अंतिम नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

२३) उपरोक्त प्रस्तावाबाबत वृक्षांविषयी भविष्यामध्ये निर्माण होणारे आक्षेप व न्यायालयीन प्रकरणांची संपूर्ण जबाबदारी अर्जदार / जागा मालक / विकसक यांची राहील.

२४) सदर रेखांकन हे (Tentative Layout Approval) तात्पुरते रेखांकन मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे. सदर रेखांकनाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन (Final Layout Approval) अंतिम रेखांकन मंजूरी घेणे बंधनकारक आहे.

२५) नियोजित इमारतीसाठी/ विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पिण्याच्या पाण्याची सोय आपण अश्वासित केलेल्या सक्षम प्राधिकरणाने/ ग्रामपंचायतीने न केल्यास या प्रकल्पास पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता अर्जदार / विकासक / जमिन मालक यांनी स्वखर्चाने प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांनी नोटरीईज्ड पत्र क्र.५७, दि. ०२/०४/२०२५ रोजीचे हमीपत्र जोडले आहे. त्यातील सर्व अटी व शर्ती अर्जदार/विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधन राहील. त्याचप्रमाणे सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची सुयोग्य व्यवस्था प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे बंधनकारक राहील.

२६) केंद्र शासनाच्या Ministry Of Civil Aviation ची अधिसूचना क्र. G.S.R. ७५१ (E) दि. ३०/०९/२०१५ अन्वये इमारतीच्या उंचीवर बंधने घालण्यात आलेली आहेत. AVIATION विभागाच्या COLOUR CODED ZONING MAP नुसार P७ या विभागात समाविष्ट असुन P-७ विभागाकरिता अनुज्ञेय उंची ७४२.० मी AMSL आहे. या कार्यालयात उपलब्ध असलेला ELU नकाशानुसार **AMSL** ६४०.० मी. आहे. सदर प्रस्ताव हा फक्त रेखांकनाचा प्रस्ताव असल्याने सदर रेखांकन नकाशाप्रमाणे AVIATION विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक नाही. तथापि, त्यानुषंगाने जागेवरील AMSL अनुज्ञेय होणारी रेखांकनाची टॉप लेवल उंचीबाबतची खातरजमा करणे अर्जदार/ वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील.

२७) सदर प्रकरणी अर्जदार सुधारित तात्पुरते रखांकन परवानगी वेळी छाननी शुल्क चलन क्र. SCRF/२१० दि. ०२/०६/२०२५ रक्कम रुपये ९४०००/-, अतिरिक्त विकास शुल्क चलन दि. २८/०७/२०२५ रक्कम रुपये ४२०३९९०/-, व विकास शुल्क चलन दि. [illegible]/०७/२०२५ रक्कम रुपये ९४४४६०/- अन्वये ऑनलाईन प्रणालीद्वारे भरणा केलेला आहे.

पु.म.प्र.वि.प्रा. पुणे



Housiey.com

मौजे-जांभुळ, तालुका-मावळ,जिल्हा- पुणे, येथील ग. नं.२०२, २०३, २०४, २०५, २०८, २१२पै, २१३, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२६, २२७, २२८, २२९, २३२, २३३, २३५पै, २३७पै, क्षेत्र-२५४७२०.००चौ.मी. क्षेत्रावरील **"सुधारित तात्पुरते रहिवास रेखांकन"** प्रस्ताव.

---

२८) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, ,एन.ए. प्रिमियम, विकास शूल्क, इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२९) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची सुधारित तात्पुरती विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

३०) प्रस्तावासोबतच्या रेखांकन/बांधकाम नकाशांचे दोन संच स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्वातावासोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत.

(मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्येतेने )

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे * पुणे *
पु.म.प्र.वि.प्रा.

सह महानगर नियोजनकार
(विकास परवानगी विभाग)
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे

Housiey.com

Housiey.com